**क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

# नाशिक विभाग

## नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार

# जिल्हा व तालुका क्रीडा संकुल, नंदुरबार
# संक्षिप्त टिपणी

| | |
|---|---|
| 1 | **जिल्हा क्रीडा संकुल, नंदुरबार** |
| | नंदुरबार जिल्हा क्रीडा संकुलात इनडोअर हॉल, इनडोअर हॉल विद्दयुतीकरण, पाणी पुरवठा, बॅडमिंटन सिंथेटीक फलोरिंग, जलतरण तलाव फिल्ट्रेशन प्लॉन्ट, वस्तीगृह इमारत, व्हि.आय.पी. पॅव्हेलियन , ड्रेनेज, कंपाऊड वॉल, लॉन-टेनिस (मातीचे) मैदान, अंतर्गत रस्ते खडीकरण, जलतरण तलाव बांधकाम करणे, वस्तीगृह पॅव्हेलियन विद्दयुतीकरण, पॅव्हेलियन, विविध खेळाची मैदाने, शुटींगरेंज हॉल, कॅफेटेरिया इमारत, अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण, कार्यालय इमारत व अधिकारी/ कर्मचारी निवास, सपाटीकरण, शुटींगरेंज हॉल कार्यालय इमारत व अधिकारी/ कर्मचारी निवास विद्दयुतीकरण, क्रीडा साहित्य खरेदी, व्यायामशाळा साहित्य खरेदी, बास्केटबॉल पोल सेट मिनी हॅड रोलर खरेदी, लॉन टेनिस सिंथेटिक करणे, जिक्रीअ कार्यालय ते कर्मचारी निवास अंतर्गत रस्ता, लॉन टेनिस सिंथेटिक वास्तुविशारद फी इत्याबी क्रीडा बाबींकरीता रु.800.00 लक्ष खर्च करण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय क्र.राक्रीधो-2019/प्र.क्र.92/क्रीयुसे-1 दि.23 मार्च 2022 अन्वये शासनाने अनुदान मर्यादा रु.2300.00 लक्ष केलेली आहे. त्यानुसार सदर जिल्हा क्रीडा संकुलाचे रु.4133.46 लक्ष चे अंदाजपत्रक क्रीडा विकास समितीस सादर करण्यात आलेले होते.<br>सदर संकुलामध्ये प्रथम टप्याचे क्रीडा सुविधा विकसीत करण्यासाठी रु.1500.00 लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यात कार्यालयीन नविन इमारत करणे, नविन वसतीगृह बांधणे, इनडोअर हॉल दुरुस्ती करणे, शुटींग रेंज हॉल दुरुस्ती करणे, विविध खेळाची मैदाने दुरुस्ती करणे, नविन खेळाची मैदाने तयार करणे, विद्युतीकरण, पेव्हर्स ब्लॉक, पार्किंग, रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे, पाणी पुरवठा व ड्रेनेज व्यवस्था, वसतीगृह इमारत-अद्यावत करणे, फर्निचर व इतर खर्च इत्यादी बाबींचा समावेश असुन अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार मार्फत तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| 2 | **तालुका क्रीडा संकुल, नंदुरबार** |
| | तालुका क्रीडा संकुल, नंदुरबार करीता सार्वजनिक बांधकाम विभाग नंदुरबार मार्फत रु.2517.23 लक्षचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन दि.31/1/2024 रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेले होते. त्यानुसार प्रथम टप्यामध्ये रु.500.00 लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असुन इनडोअर हॉल बांधकाम करणे, संरक्षक भिंत, मेनगेट व सुरक्षा रक्षक कॅबीन तयार करणे, मुलां-मुलींकरीता स्वच्छता गृह तयार करणे, रेन वॉटर हार्वेस्टींग करणे, सोलर रुफ, वॉटर सप्लाय, विद्युतीकरणे, अंतर्गत रस्ते, विविध खेळांची मैदाने तयार करणे, पार्कीग सी.सी.टी.व्ही.इत्यादी सुविधा निर्माण करण्यात येणार आहे.<br>तसेच व्यापारी गाळांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन व्यापारी गाळयांच्या बांधकामावर रु.13,70,94,810/- इतकी रक्कम खर्च होवू शकते. तसेच व्यापारी गाळांची संख्या 70 आहे. सदरचा व्यापारी गाळयांच्या बांधकामावर होणारा खर्च गाळयांच्या लिलाव करुन मिळणाऱ्या अनामत रकमेतुन भागविण्यात येणार आहे.<br>त्यामुळे सदर व्यापारी गाळे बांधकामाकरीता कोणत्याही प्रकारचा शासकीय निधी खर्च होणार नाही. व शासनावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नाही. सदर व्यापारी गाळे बांधकामाकरीता वापरण्यात येणारी अनामत रक्कम ही गाळांपासून मिळणाऱ्या भाडयातुन उभारण्यात येणार आहे. त्यामुळे अनामत रक्कम परत करण्याचा बोजा सुध्दा शासनावर राहणार नाही. क्रीडा सुविधा निर्माण करण्याकरीता शासकीय अनुदाना व्यतिरिक्त लागणारा निधी गाळयांच्या उत्पन्नातुन खर्च करण्यात येणार आहे. (उदा. प्रशासकीय इमारत, मल्टीपर्पज गेम हॉल, लायब्ररी इ.) |

| | |
|---|---|
| 3 | **तालुका क्रीडा संकुल, शहादा** |
| | तालुका क्रीडा संकुल, शहादा करीता सार्वजनिक बांधकाम विभाग नंदुरबार मार्फत रु.3569.41 लक्षचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन दि.31/1/2024 रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेले होते. त्यानुसार प्रथम टप्यामध्ये रु.400.00 लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असुन इनडोअर हॉल दुरुस्ती करणे, संरक्षक भिंत, मेनगेट व सुरक्षा रक्षक कॅबीन तयार करणे, मुलां-मुलींकरीता स्वच्छता गृह तयार करणे, रेन वॉटर हार्वेस्टींग करणे, सोलर रुफ, वॉटर सप्लाय, विद्युतीकरणे, अंतर्गत रस्ते, विविध खेळांची मैदाने तयार करणे, पार्कीग सी.सी.टी.व्ही.इत्यादी सुविधा निर्माण करण्यात येणार आहे.<br>तसेच व्यापारी गाळांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन व्यापारी गाळयांच्या बांधकामावर रु.20,77,96,747/- इतकी रक्कम खर्च होवू शकते. सदरचा व्यापारी गाळयांच्या बांधकामावर होणारा खर्च गाळयांच्या लिलाव करुन मिळणाऱ्या अनामत रकमेतुन भागविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर व्यापारी गाळे बांधकामाकरीता कोणत्याही प्रकारचा शासकीय निधी खर्च होणार नाही. व शासनावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नाही. सदर व्यापारी गाळे बांधकामाकरीता वापरण्यात येणारी अनामत रक्कम ही गाळांपासून मिळणाऱ्या भाडयातुन उभारण्यात येणार आहे. त्यामुळे अनामत रक्कम परत करण्याचा बोजा सुध्दा शासनावर राहणार नाही. क्रीडा सुविधा निर्माण करण्याकरीता शासकीय अनुदाना व्यतिरिक्त लागणारा निधी गाळयांच्या उत्पन्नातुन खर्च करण्यात येणार आहे.(उदा. प्रशासकीय इमारत, मल्टीपर्पज गेम हॉल, लायब्ररी इ.) तसेच नंदुरबार तालुका क्रीडा संकुल येथे मान्य करण्यात आलेल्या क्रीडा सुविधा कोणत्याही प्रकारचा बाधा न येता व्यापारी गाळांची उभारणी करण्यात येणार आहे. |
| 4 | **तालुका क्रीडा संकुल, तळोदा** |
| | तालुका क्रीडा संकुल, तळोदा चे रु.700.00 लक्ष चे अंदाजपत्रक क्रीडा विकास समितीस सादर करण्यात आलेले होते. सदर संकुलामध्ये प्रथम टप्याचे क्रीडा सुविधा विकसीत करण्यासाठी रु. 300.00 लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असुन इनडोअर हॉल दुरुस्ती करणे, संरक्षक भिंत व सुरक्षा रक्षक कॅबीन तयार करणे, मुलां-मुलींकरीता स्वच्छता गृह तयार करणे, रेन वॉटर हार्वेस्टींग करणे, वॉटर सप्लाय, विद्युतीकरणे, अंतर्गत रस्ते, विविध खेळांची मैदाने तयार करणे, पार्कीग इत्यादी सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. |
| 5 | **तालुका क्रीडा संकुल, नवापूर** |
| | नवापूर तालुका क्रीडा संकुलाकरीता रु.87.00 लक्ष रकमेत इनडोअर हॉल, कार्यालय, विद्युतीकरण, व्यायामशाळा हॉल, संरक्षक भिंत,विविध खेळाची मैदाने-व्हॉलीबॉल, कबड्डी इ. क्रीडा सुविधां निर्माण करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर संकुलाकरीता जागा पर्याप्त नसल्यामुळे शहरात नविन शासकीय जागेचा मिळविण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| 6 | **तालुका क्रीडा संकुल, अक्कलकुवा** |
| | अक्कलकुवा तालुका क्रीडा संकुलाकरीता अक्कलकुवा गावापासुन किमान 7 ते 8 किमी अंतरावर नर्मदानगर पुर्न. येथे जागा प्राप्त झालेली आहे. तालुका क्रीडा संकुलात क्रीडा सुविधा निर्माण केल्यास 7 ते 8 किमी अंतरावर असल्यामुळे खेळाडूंना दररोज सरावकरीता जाणे-येणे शक्य होणार नसल्यामुळे अक्कलकुवा गावात जवाहर नवोदय विद्यालयाची क्रीडांगणाची जागा मिळविण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| 7 | **तालुका क्रीडा संकुल, धडगाव** |
| | सदर धडगाव तालुक्यातील बहुतांश भाग डोंगराळ व वन जमिन आहे. तसेच सदर क्रीडा संकुलाकरीता गावात किंवा लगत शासकीय जागा मिळविण्याची कार्यवाही सुरु आहे. |

# जळगाव जिल्हा

# विभागीय क्रीडा संकुल, जळगांव टिपणी

जळगांव येथे अतिरिक्त विभागीय क्रीडा संकुल बांधकाम करणेसाठी मेहरूण शिवारात गट नं.343 चे एकूण क्षेत्र 14.65 हे.आर. जागा मिळालेली आहे. सदर जागेस शासन निर्णय क्र.विक्रीसं-1123/प्र.क्र.70/क्रीयुसे-1 दि.9 जुन 2023 नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्याच प्रमाणे क्रीडा व युवक सेवा संचालनालय म.रा.पुणे यांचे दि.26/9/2023 रोजीच्या पत्रान्वये या प्रकल्प बांधकामासाठी रू.240.54 कोटी च्या अंदाजपत्रकाच्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

या अनुषंगाने जळगांव येथे अतिरिक्त विभागीय क्रीडा संकुल उभारणेसाठी क्रीडा विभागाच्या अधिपत्त्याखाली विभाग, जिल्हा व तालुका येथे देखभाल व दुरूस्ती व बांधकाम करणेसाठी संकुलातील क्रीडा प्रकारानुसार आवश्यकते प्रमाणे वैशिष्टपुर्ण अद्ययावत व दर्जेदार क्रीडा सुविधांची निर्मिती करण्यासाठी राज्यस्तरीय नामिकासुचीवर (Architecture- Cum- Poroject Management/consultant Panel) सुयोग्य / अनुभवी वास्तुविशारदाकांची प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीनुसार श्रेणी निश्चित करण्यात आलेली आहे. सदर निश्चित केलेल्या श्रेणीतील वास्तुविशारद यांची नियुक्ती प्रकल्प बांधकामासाठी करण्यात यावे असे क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे यांचे दि.26/7/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. यामध्ये 3 कंपनी/फर्म/संस्था यांचा समावेश आहे. त्या खालील प्रमाणे आहेत.

1. मे.कोलाज डिझाईन प्रा.लि. मुंबई
2. मे.शशी प्रभु ॲन्ड असोसिएट मुंबई
3. मे.व्ही.के.आर्कीटेक्चर पुणे

उपरोक्त जागेवर विभाग क्रीडा संकुलाचे बांधकाम करणेसाठी बेसिक टाईप प्लॅन तयार करण्यात येवून तो दि.4/10/2023 पर्यंत प्रेझेंटेशनसाठी सादर करण्याबाबत वास्तुविशारद यांना 24/8/2023 च्या पत्रान्वये विभागीय क्रीडा संकुल समितीच्या वतीने जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले होते.

त्यानुसार विभागीय क्रीडा संकुलाचे जळगांव येथे बांधकाम करणेसाठी वरील वास्तुविशारदांनी दि.4/10/2023 आणि दि.3/11/2023 रोजी प्रेझेंटेशन सादर केले. सदर सुधारित सादरीकरणात दोन कंपनी आपला सहभाग घेतला. या दोन कंपनीपैकी मे.शशीप्रभु ॲन्ड असोसिएटस् यांचे सादरीकरण सर्व सदस्यांना योग्य वाटले त्यामुळे सदर प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यासाठी मे.शशीप्रभु ॲन्ड असोसिएटस् मुंबई यांची प्रकल्प किमतीच्या **दोन टक्के** दराने नियुक्त करण्यात आली.

त्यानुसार वास्तुविशारद यांनी बांधकामाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करून माहे फेब्रुवारी 2024 मध्ये या कार्यालयाकडे सादर केलेली होती. सदरच्या अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी माहे फेब्रुवारी 2024 मध्ये सा.बा.विभाग,जळगांव यांचेकडे सादर करण्यात आली आहे. सदरचे अंदाजपत्रकास सा.बां.विभाग, जळगांव यांनी दि.14/3/2024 रोजी मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केलेली आहे. सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून तांत्रिक मान्यता अप्राप्त आहे. तसेच त्यांनी तांत्रीक मान्यते करीता फी आकरणी केली असूण त्या बाबत त्यांना शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा दिनांक 21 मार्च

2017 च्या शासन निर्णयानुसार तांत्रीक मान्यता करीता सुट मिळावी अशी विनंती केलेली आहे. तथापी शासनाच्या बांधकाम विभागा मार्फत दिनांक ११ जुन २०२४ च्या पत्रान्वये दिनांक १८/०६/२०२४ च्या मा. मुख्य अभियंता, सा.बा.विभाग नाशिक यांचे पत्रान्वये तांत्रीक मान्यता तपासणी शुल्क अंदाजपत्रकीय किंमतीच्या १.२५ टक्के तात्काळ भरणा करणे बाबत कळविलेले आहे. विभागीय क्रीडा संकुल जळगांव चे अंदाजपत्रक रु २४०.५४ कोटी इतके असून तांत्रीक मान्यता तपासणी शुल्क रू ३.०० कोटी तात्काळ भरणे बाबत कळविले आहे. दिनांक २२ मे २०२४ रोजीच्या मुख्य अभियंता, सा.बा.विभाग नाशिक यांनी रू २४०.१७ कोटी अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे.

विभागीय क्रीडा संकुल जळगांव करीता रु. २४०.५४ कोटी ची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून निधी अप्राप्त आहे. निधी वितरण कॅबिनेट ची मान्यता तथा एच पी. सी. ची मान्यता प्राप्त झाल्यानंतर होणार आहे. तथापी सद्यस्थीतीत मे. शशी प्रभु आर्किटेक्ट यांचे मार्फत टेंडर डॉक्युमेंट तयार करण्याची कार्यवाही सुरु असून सदर डॉक्युमेंट मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचे मार्फत तपासून विभागिय क्रीडा संकुल समितीची मान्यता घेऊन निविदा प्रक्रीया करण्यात येणार आहे.

**जळगांव जिल्हा क्रीडा संकुल**

- जिल्हा क्रीडा संकुल, जळगांव येथील रू. ८.०० कोटी च्या मर्यादेत खालील सुविधा पुर्ण झालेल्या आहेत.
  ४०० मी धावन मार्ग, बहुउद्देशिय (वुडन कोर्ट) हॉल, वसतीगृह, स्क्वॉश कोर्ट, जलतरण तलाव,
  टेनिस कोर्ट, बास्केटबॉल कोर्ट, विविध खेळांचे मैदान, प्रेक्षक गॅलरी ई.

- दिनांक ०२/०५/२०२३ नुसार व नविन शासन निर्णयानुसार रू १५.०० कोटी च्या मर्यादेत खालील बाबींकरीता प्रशास्किय मान्यता प्राप्त झाली.
  प्रेक्षक गॅलरी रुफींग करणे, रनिंग ट्रॅक सिंथेटीक करणे, रनिंग ट्रॅक भोवती विद्युतीकरण करणे, फुट्बॉएल ग्राऊंड स्प्रींकलर सिस्टीम करणे, व्यापारी गाळ्याकडील पार्किंग जागेत पेव्हींग ब्लॉक बसवणे, जिल्हा क्रीडा संकुलातील टॉयलेट ब्लॉक्स दुरुस्ती करणे या बाबींचा समावेश आहे.

- सदर कामाचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडून निविदा प्रक्रीया करण्यात आली असून कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे. लवकरच सदर काम सुरु होणार आहे.

# तालुका क्रीडा संकुल (जळगाव जिल्हा)

जळगांव जिल्ह्यात एकुण 15 तालुके असून 12 तालुक्यांमध्ये  एक कोटी इतक्या मर्यादेत काम झालेले असून क्रीडा संकुल निर्मितीच्या नविन धोरणानुसार खालील तालुक्यांमध्ये बांधकांम सुरु झले आहे.

1.अंमळनेर, 2. धरणगांव, 3. भडगांव, 4.पारोळा, 5. चाळीसगांव, 6. भुसावळ,    या 6 तालुक्यांचे बांधकाम नविन धोरणानुसार प्राप्त निधीतून सुरु झालेले आहे. तसेच पाचोरा, चोपडा आणि एरंडोल तालुक्याची निविदा प्रक्रीया करणेची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत सुरु असून  रू 1.00 कोटी मर्यादेत उर्वरीत तालुके,  मुक्ताईनगर, रावेर तालुक्यांचे काम झालेले आहे.

तसेच जळगाव तालुका, बोदवड आणि जामनेर  तालुका क्रीडा संकुल करीता जागा उपलब्ध झालेली नसल्याने काम सुरु नाही.

# धुळे जिल्हा

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा धोरणा 2001 अन्वये, राज्यात जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुलाची व तालुक्याच्या ठिकाणी तालुका क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात आली असुन, धुळे जिल्हयात जिल्हा मुख्यालयी राष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुल, धुळे अंतर्गत जिल्हा क्रीडा सकुलाचा नोंदणी क्रमांक एफ/5691/धुळे/2003 हा असुन जिल्हा क्रीडा संकुल, वाडीभोकर रोड येथील सर्व्हे नं. 1/2 मधील एकूण 12.5 एकर जागेमध्ये शासन निर्णयानुसार धुळे जिल्हा क्रीडा संकुलात क्रीडा सुविधा विकसीत करण्यासाठी प्रथम टप्प्यात रु.800.00 लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले होते. सदर अनुदानातुन खालील सुविधा तयार करण्यात आल्या.

1) इनडोअर हॉल मधिल हॉल बॅडमिटन हॉल,रायफल शुटींग हॉल, कुस्ती हॉल, स्वॅक्श हॉल, टेबल टैनिस हॉल,
2) जलतरण तलाव फिलट्रेशन प्लांटसह (25 बाय 50 मी.), मल्टी जिम
3) प्रेक्षक गॅलरी
4) 400 मी. धावन पथ
5) सिंथेटीक बॅडमिंटन कोर्ट, कॅफटैरिया
6) बास्केटबॉल मैदान
7) खेळाडूंचे मुला मुलींचे वसतीगृह
8) सिंथेटीक लॉन टेनिस कोर्ट
9) खुले प्रेक्षागृह
10) व्ही.आय.पी. पॅव्हेलियन
11) कॅफेटेरिया, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा इ. सुविधा विकसित करण्यात आलेल्या आहेत.

- सदर अनुदानातुन वाणिज्यिक प्रयोजनातुन 289 गाळे बांधण्यात आले आहे. तसेच याच अनुदानातुन पाणी पुरवठा, अंतर्गत रस्तेचे डांबरीकरण, मल्टीजिम, कार्यालय इमारत, जमीन सपाटीकरण इ. सुविधा विकसित करण्यात आलेल्या आहेत.
- तसेच नविन शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा संकुल समिती, धुळे येथे 23 मार्च 2022 च्या शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा संकुल येथे 400 मीटर सिथेटिक्स ट्रॅक, फुटबॉल ग्रास ग्रांडऊ, जिम्नॅस्टिक्स व कुस्तीचा स्वंत्रत हॉल साठी रु. 1500.00 लक्षचा प्रस्ताव शासनकडे सादर करण्यात आलेला आहे.
- जिल्हा क्रीडा संकुल, धुळे चे बांधकाम सन 2007 मध्ये पुर्ण झालेले असुन बांधकाम व इतर बाबींसाठी **एकूण रु.10.34 कोटी निधी खर्च झालेला आहे.** जिल्हा क्रीडा संकुल, धुळे व इतर प्रकल्पाचे **दि.05 ऑक्टोबर 2007 रोजी दिवंगत मा. नामदार श्री. विलासराव देशमुख, तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले होते** व त्यानंतर विविध खेळाच्या सुविधा धुळेकर जनतेसाठी खुल्या करण्यात आलेल्या आहेत.

- जिल्हा क्रीडा संकुल हे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असुन विकसित करण्यात आलेल्या क्रीडा सुविधांचा वापर नाममात्र शुल्क आकारणीवर जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या निर्णयानुसार सुरु करण्यात आले असुन सदर संकुलात खेळाडू, नागरिक जास्तीत जास्त लाभ घेत आहेत. तसेच संकुलाचा वापर जेष्ठ नागरिक, पोलीस भरती करीता प्रयत्न करणारे युवक व युवती, शालेय/ महाविद्यालयीन खेळाडू करीत आहे.

➢ **तालुका क्रीडा संकुल, गरुड मैदान, धुळे-** सदर तालुका क्रीडा संकुलाकरीता रु. 100.00 लक्ष निधी प्राप्त झाला असुन प्रत्यक्ष झालेला विविध खेळाच्या मैदानासाठी खर्च रु. 100.00 लक्ष झालेला आहे. तालुका क्रीडा संकुल, गरुड मैदान धुळे शहरात मध्यवर्ती ठिकाणी महानगरपालिकेच्या जागेत 2.5 एकर जागेमध्ये विकसित करण्यात आलेले आहे. गरुड मैदान संकुल बाधंकामासाठी शासनाकडुन प्राप्त झालेला एक कोटी निधीखर्च करण्यात आलेले आहे. तसेच व्यापारी गाळे बांधकामासाठी वाणिज्य प्रयोगातुन 209 गाळे बांधण्यात आलेले आहे. गाळेधारकांकडुना अनामत रक्कम रुपये 10.00 कोटी रक्कम संकुलास प्राप्त झाली त्यामधुन गाळे बांधकामासाठी रुपये 500.00 कोटी निधी खर्च करण्यात आलेला आहे.

**विकसित करण्यात आलेल्या खेळ बाबी खालीलप्रमाणे** –

1. प्रेक्षक गॅलरी
2. कबड्डी, खो- खो, व्हॉलीबॉल, हॅण्डबॉल चे मैदाने
3. कार्यालय, स्टोअर रुम
4. वाणिज्य प्रयोगातुन 209 गाळे व हॉल
5. सद्या मैदानात खोखो,कबड्डी, व्हॉलीबॉल,नेटबॉल,हॅण्डबॉल,बॉक्सिग हे प्रशिक्षण सुरु आहे.

➢ **तालुका क्रीडा संकुल, साक्री -** सदर तालुका क्रीडा संकुलाकरीता रु. 100.00 लक्ष निधी प्राप्त झाला असुन प्रत्यक्ष झालेला विविध खेळाच्या मैदानासाठी खर्च रु. 100.00 लक्ष झालेला आहे. तालुका क्रीडा संकुल, साक्री शहरात मध्यवर्ती ठिकाणी शासकीय जागेत 2.5 एकर जागेमध्ये विकसित करण्यात आलेले आहे. तालुका संकुल बाधंकामासाठी शासनाकडुन प्राप्त झालेला एक कोटी निधी खर्च करण्यात आलेले आहे.

➢ **विकसित करण्यात आलेल्या खेळ बाबी खालीलप्रमाणे** –

1. इनडोअर हॉल,
2. कबड्डी, खो- खो, व्हॉलीबॉल, क्रीकेट, फुटबॉल चे मैदाने
3. कार्यालय, स्टोअर रुम
4. सद्या मैदानात क्रीकेट, फुटबॉल, बॅडमिटन ,खोखो, कबड्डी, व्हॉलीबॉल,हे प्रशिक्षण सुरु आहे.

➢ **तालुका क्रीडा संकुल, शिरपुर** - सदर तालुका क्रीडा संकुलाकरीता रु. 100.00 लक्ष निधी प्राप्त झाला असुन प्रत्यक्ष झालेला विविध खेळाच्या मैदानासाठी व इनडोअर हॉल, कार्यालयासाठी खर्च रु. 49.50 लक्ष खर्च झालेला आहे. तालुका क्रीडा संकुल, शिरपुर शहरात मध्यवर्ती ठिकाणी शासकीय जागेत 2.5 एकर जागेमध्ये विकसित करण्यात आलेले आहे.

तालुका संकुल बाधंकामासाठी शासनाकडुन प्राप्त झालेला रु 49.50 लक्ष निधी  खर्च करण्यात आलेले आहे व तालुका क्रीडा संकुल समितीकडे रु 52.50 निधी शिल्लक आहे.

- **विकसित करण्यात आलेल्या खेळ बाबी खालीलप्रमाणे** –

1. इनडोअर हॉल,
2. बास्केटबॉल ,कबड्डी, खो- खो, व्हॉलीबॉल, चे मैदाने
3. कार्यालय, स्टोअर रुम
4. सद्या कुस्ती, बास्केटबॉल हे प्रशिक्षण सुरु आहे.

## धुळे जिल्ह्यातील तालुका क्रीडा संकुल माहिती.

| क्र. | तालुका क्रीडा संकुल | एकूण प्राप्त अनुदान | झालेला खर्च | शिल्लक | अद्ययावत माहिती |
|---|---|---|---|---|---|
| 1. | धुळे | 100.00 लक्ष | 100.00 लक्ष | निरंक् | • तालुका क्रीडा संकुल, धुळे (गरुड मैदान) धुळे शहारातील मध्यवर्ती ठिकाणी महानगर पालिका मधील 2.5 एकर जागा प्राप्त झालेली संकुलात<br>• प्रेक्षगॅलरी, कबड्डी, खो-खो मैदाने, कार्यालय, स्टोअर रुम तसेच वाणिज्य प्रयोगातुन 209 गाळे व हॉल बांधकाम करण्यात आलेले आहे. इत्यादी बाबींचे बांधकाम पुर्ण झालेले आहेत. |
| 2. | साक्री | 100.00 लक्ष | 100.00 लक्ष | निरंक् | • **तालुका क्रीडा संकुल, साक्री नगर परिषदर हद्दीतील शासकीय गट क् 9 मधिल न्यु इंगिल्श स्कुल च्या भितीजवळी 3.98 जागा तालुका क्रीडा संकुल साक्रीसाठी प्रापत झालेली आहे.**<br>• **संकुलात बुहदेशिय हॉल, कार्यालय, विविध खेळाचे मैदान, क्रीकेट मैदान, संरक्षण भिंत बॅडमिटन हॉल, बांधकाम पुर्ण झालेले आहे.** |
| 3. | शिरपुर | 100.00 लक्ष | 47.50 लक्ष | 52.50 लक्ष | • सदर तालुका क्रीडा संकुल, शिरपुर करीता जागा 2.5 एकर जागा नगरपरिषद शिरपुर मालकीची सि स न 283-285 प्राप्त झालेली असुन सदर<br>• जागेवर इनडोअर हॉल, बास्केटबॉल मैदान, कबड्डी, खो-खो मैदाने व संरक्षण भिंत इत्यादी बाबींचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. |
| 4. | शिदंखेडा | 00.00 लक्ष | 00.00 लक्ष | 00.00 लक्ष | • सदर तालुका क्रीडा संकुलाकरीता शिंदखेडा शहराजवळ मध्यवती ठिकाणची जागा क्र. 38 मधिल 1 हेक्टर 49 आर जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>• नविन जागा प्रस्तावित करण्यात आलेली आहे. |

# जिल्हा क्रीडा संकुल, नाशिक

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | प्राप्त निधी (कोटीत) | जिल्हा क्रीडा संकुलांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा क्रीडा संकुल, नाशिक | ५.३१ | प्रशासकीय मान्यता रू. २८.१३ कोटींची मिळालेली असून २५.०० कोटीच्या मर्यादेत कामास सुरूवात झालेली आहे. यात प्रशासकीय इमारत, इनडोअर गेम हॉल-दुमजली इमारत (व्यायामशाळा, कुस्ती, ज्यूदो हॉल, बॅडमिंटन हॉल) ४०० मी. सिंथेटीक ट्रॅक, फुटबॉल मैदान, कबड्डी, खोखो व व्हॉलिबॉल मैदान, क्रिकेट नेट्स व प्रसाधनगृह इत्यादी बाबींचा समावेश आहे. |

## तालुका क्रीडा संकुल, नाशिक

नाशिक जिल्ह्यात एकूण १५ तालुके असून एकूण १७ तालुका क्रीडा संकुले अस्तित्वात आहेत. या तालुका क्रीडा संकुलांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | प्राप्त निधी (कोटीत) | तालुका क्रीडा संकुलांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | नांदगाव | १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, २०० मी. रनिंग ट्रॅक, क्रीकेट नेट, भिंतीचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे अंदाजपत्रक व आराखडे लवकरच तयार करून सादर करण्यात येतील. |
| २ | येवला | १.०० + १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० व जिल्हा नियोजन मार्फत रू. १.०० असे २.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, जलतरण तलाव, व्यायामशाळा, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, २०० मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (नियोजन विभाग) व ३.०० | रनिंग ट्रॅक, बास्केटबॉल सिमेंट कोर्ट, भिंतीचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटीची मान्यता व निधी प्राप्त झालेला असून सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे यांचे तांत्रिक मान्यता घेवून निविदा प्रक्रीयेस सुरूवात करण्यात येत आहे. |
| ३ | इगतपूरी | १.०० + १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, २०० मी. रनिंग ट्रॅक, तारेचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटीस मान्यता मिळाली असून तीन कोटींचे मर्यादेत अंदाजपत्रक व आराखडे तांत्रिक मान्यतेस सादर करण्यात आले आहेत. रू. १.०० कोटी रक्कम प्राप्त असून उर्वरीत दोन कोटी प्राप्त होताच निविदा प्रक्रीया सुरू करण्यात येईल. |
| ४ | सिन्नर | १.०० + १०.५० | सद्यस्थितीत क्रीकेट पॅव्हेलियन इमारत, विविध खेळांची मैदाने, क्रीकेट मैदान, प्रसाधन गृह, पाण्याची टाकी, बोअरवेल, २०० मी. रनिंग ट्रॅक इत्यादि बाबी पूर्ण झालेल्या असून भिंतीचे कुंपण ७० टक्के पूर्ण झालेले आहे, उर्वरीत कुंपण ठेकेदाराने खर्च जास्त झाल्याचे कारण देवून पूर्ण करण्यास नकार दिला. एकूण ११२५.०० लक्ष इतका निधी खर्च झालेला आहे.<br>तसेच तालुका क्रीडा संकुलाच्या जागेवर काही घरांचे अतिक्रमण झालेले असून त्याची केस तालुका क्रीडा संकुलाचे बाजूने लागलेली असून संबंधित अतिक्रमण धारक यांनी अपिल केलेले आहे. |
| ५ | मालेगाव बाह्य | ०.५० + ९९.०७ | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. ०.५० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, २०० मी. रनिंग ट्रॅक, भिंतीचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार १.५० कोटीचे अंदाजपत्रक व आराखडे लवकरच तयार करून सादर करण्यात येतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | मालेगाव मध्य | ०.५० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. ०.५० कोटींमध्ये क्रीकेटचे मैदान, भिंतीचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार १.५० कोटी चे अंदाजपत्रक व आराखडे लवकरच तयार करून सादर करण्यात येतील. |
| ७ | चांदवड | १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, २०० मी. रनिंग ट्रॅक, तारेचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे अंदाजपत्रक व आराखडे लवकरच तयार करून सादर करण्यात येतील. |
| ८ | त्र्यंबकेश्वर | १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, २०० मी. रनिंग ट्रॅक, भिंतीचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे अंदाजपत्रक व आराखडे लवकरच तयार करून मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. |
| ९ | सुरगाणा | १.०० + ३.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार सन २०१४-१५ या वर्षात रू. १.०० कोटींपैकी ०.९१ कोटी रक्कम सार्व.बांध. विभागाकडे वर्ग केलेली असून या अंदाजपत्रकानुसार खालील बाबींचा समावेश होता<br>१. जमीन सपाटीकरण करणे - करण्यात आलेली नाही<br>२. बॅडमिंटन कोर्टचे बांधकाम (इनडोअर हॉल) - अद्याप अपूर्ण अवस्थेत<br>३. संरक्षक भिंत बांधणे - अद्याप अपूर्ण अवस्थेत<br>४. इतर अनुषंगीक कामे - कोणतेही काम हाती घेण्यात आलेले नाही.<br>मा. अध्यक्ष महोदयांचे सुचनेनुसार वरील अर्धवट कामे व नवीन कामे सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटीचे अंदाजपत्रकात समाविष्ट करून येत्या १५ दिवसात निविदा सुचना प्रसिध्द करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास सांगितलेले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | निफाड | १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, २०० मी. रनिंग ट्रॅक, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, भिंतीचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे अंदाजपत्रक व आराखडे लवकरच तयार करून मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. |
| ११ | पेठ | १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, २०० मी. रनिंग ट्रॅक, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, तारेच कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. निधी प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल. निधी प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| १२ | दिंडोरी | १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, २०० मी. रनिंग ट्रॅक, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, तारेच कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. |
| १३ | बागलाण | १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, २०० मी. रनिंग ट्रॅक, लॉनटेनिस कोर्ट, तारेचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे अंदाजपत्रक व आराखडे लवकरच तयार करून मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. |
| १४ | देवळा | १.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, भिंतीचे कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे अंदाजपत्रक व आराखडे लवकरच तयार करून मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | कळवण | १.०० + ३.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, व्हॉलिबॉल, खो-खो व कबड्डी मैदाने, २०० मी. रनिंग ट्रॅक, कार्यालयीन इमारत, चेनलिंक कुंपण इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटीची मान्यता व निधी प्राप्त झालेला असून मा. आमदार महोदयांनी येत्या १५ दिवसात निविदा सुचना प्रसिध्द करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास सांगितलेले आहे. |
| १६ | नाशिक | १.०० + ३.०० | पूर्वीच्या शासन निर्णयानुसार रू. १.०० कोटींमध्ये इनडोअर हॉल, व्यायामशाळा, क्रिकेट मैदान पॅव्हेलियन सह (चेनलिंक कुंपणासह), कार्यालयीन इमारत, प्रेक्षक गॅलरी-मातीच्या भरावाची इ. बाबी पूर्ण. सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटीची मान्यता व निधी प्राप्त झालेला असून १.५० कोटी रकमेचे सद्यस्थितीत काम सुरू आहे. उर्वरीत १.५० कोटीचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यतेची प्रक्रीया सुरू आहे. |
| १७ | निफाड (पिंपळगाव बसवंत) | ०.०० | सुधारीत शासन निर्णयानुसार ३.०० कोटी चे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. यात बहुउद्देशिय हॉल, विद्युतीकरण व संरक्षक भिंत इ. बाबींचा समावेश आहे. निधी प्राप्त होताच तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रीयेची कार्यवाही सुरू करण्यात येईल. |